**वादीकरीता साक्षीदार क्र.३**

**प्रतिवादी क्र.१ ते ३ व त्यांचे विधीज्ञ पुकारले असता गैरहजर. त्यांच्या वतीने अर्जही नाही. म्हणून प्रस्तूत प्रकरण त्यांच्या वतीने होणाऱ्या या साक्षीदाराच्या उलटतपासाविना पुढे चालेल.**

**<u>प्रतिवादी क्र.४, ६ व ९ करीता उलटतपास विधिज्ञ श्री. एम. यु. तळीखेडकर यांच्यावतीने शपथेवर सुरु</u>**

०५. मला मराठी लिहिता वाचता येत नाही. मला मराठी बोललेले समजते. माझे काही शिक्षण झालेले नाही. माझे भाऊ वादी फयाज यांनी मिळकती कोणास विक्री केल्या ते मला माहीत नाही. त्यांनी केलेल्या खरेदी–विक्री व्यवहाराची मला काहीही माहिती नाही. शब्बीर महेबूब शेख व बशीर महेबूब शेख यांना मी ओळखत नाही. प्रतिवादी कलीम यांनी शब्बीर महेबूब शेख व बशीर महेबूब शेख यांच्याकडून मिळकत खरेदी केल्याचे मला माहीती नाही. प्रतिवादी पाशामियॉ हाश्मी व फयाजोद्दीन हाश्मी हे दोघे सख्खे भाऊ आहेत हे मला माहीत नाही. प्रतिवादी पाशामियॉ हाश्मी हे आणि फयाजोद्दीन हाश्मी यांची दावा मिळकत वडीलार्जित असल्याचे मला माहीत नाही.

०६. प्रतिवादी पाशामियॉ हाश्मी यांची मौजे जाऊ येथील भूमापन क्र.७४/५८/अ मधील ९ एकर व भूमापन क्र.७४/५८/ब मधील १ एकर जमीन वाड–वडीलार्जित असल्याचे मला माहीत नाही. प्रतिवादी पाशामियॉ हाश्मी आणि फयाजोद्दीन हाश्मी यांनी भूमापन क्र.७४/५८/अ मधील ९ एकर व भूमापन क्र.७४/५८/ब मधील १ एकर जमीनीचे वाटप करुन प्रतिवादी फयाजोद्दीन यांनी त्यांच्या हिस्सयास आलेली मिळकत विक्री

केली हे मला माहीत नाही. प्रतिवादी पाशामियॉ हाश्मी आणि फयाजोद्दीन हाश्मी यांच्या जमिनीशी माझा काहीही संबंध नाही हे म्हणणे खरे आहे. प्रतिवादी पाशामियॉ हाश्मी आणि फयाजोद्दीन हाश्मी यांच्या जमिनीशी वादी फयाजचा काहीही संबंध नाही हे मला माहीत नाही. मी खोटा सरतपास दाखल केला हे म्हणणे खरे नाही. मी माझे भाऊ वादी फयाज यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**प्रतिवादी क्र. ५ व १२ ते २० करीता उलटतपास विधिज्ञ श्री. पी. जी. जवळगेकर यांच्यावतीने सुरु**

०७. माझी जन्म तारीख मला आठवत नाही. माझे लग्न सन १९७२ च्या दुसऱ्यावर्षी झाले. माझ्या लग्नात माझे आई-वडील हयात नव्हते. माझ्या लग्नानंतर वादी फयाज, प्रतिवादी उस्मान आणि प्रतिवादी चॉंद याचे लग्न झाली. माझ्या वडीलांना असणाऱ्या जमिनींबाबत मला माहीत नाही. माझे वडील आम्ही लहान असताना मयत झाले. माझ्या वडीलांच्या हयातीनंतर त्यांच्या वारसांची नोंद झाली किंवा कसे हे मला माहीत नाही. माझ्या सरतपासात काय मजकूर लिहिला ते मला माहीत नाही. मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2026.07.28 15:55:09 +0530

( रवि वि. पांडे )

दिनांक २८/०७/२०२६.

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर निलंगा,
जिल्हा लातूर